ePaper

उबाठा गटाला खिंडार, 11 माजी नगरसेवकांच्या हाती धनुष्यबाण

वर्ष - 8 । अंक - 309 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

आतील पानांत

- ४ दिवसांचा होणार कसोटी सामना
- स्मृती मानधना ठरली वर्ल्ड नंबर वन!
- इराण-इस्रायल संघर्ष विकोपाला
- ड्रीमलायनरबाबत एअर इंडिया सावध

www.mahaenews.com | बुधवार, दि. 18 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इस्त्रायल आणि इराणमधील संघर्षात तीव्र वाढ

# दोन्ही देशांकडून हवाई हल्ले सुरूच!

## हवाई हल्ल्यांमध्ये इराणमध्ये किमान 224 लोकांचा मृत्यू; तेहरानचे उच्च लष्करी कमांडर, अणुशास्त्रज्ञ आणि नागरिकांचा समावेश

। जेरुसलेम / तेहरान । प्रतिनिधी । महाईन्यूज

**मध्य पूर्वेत तणाव पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. इस्त्रायल आणि इराण यांच्यातील दीर्घकाळापासून सुरू असलेला तणाव आता उघड संघर्षात परिवर्तित झाला आहे. गेल्या काही दिवसांत दोन्ही देशांनी एकमेकांवर हवाई हल्ले चढवले असून, अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात जीवित व मालमत्ता हानी झाल्याची माहिती मिळत आहे.**

इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष आणखी वाढला आहे. दोन्ही देशांकडून मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले सुरु आहेत. इस्त्रायलने इराणमधील तेहरानला टार्गेट केलं आहे. दुसरीकडे इराणनेही इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले केले आहेत. इस्त्रायलने इराणचे तेल डेपो लक्ष्य करत मोठे हवाई हल्ले केल्यामुळे संघर्ष वाढला. इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात इराणच्या प्रमुख लष्करी कमांडरचा देखील खात्मा झाला. त्यामुळे इराणला मोठा धक्का बसला आहे. आता इराणच्या सरकारी माध्यमांनी तेहरानच्या पश्चिमेला सतत आणि तीव्र स्फोटांचे वृत्त दिले आहे. इराणी राज्य माध्यम आयआरएनएच्या म्हणण्यानुसार, तेहरानच्या पश्चिमेला अनेक स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत. हल्ल्यांची मालिका गेल्या आठवड्याच्या सुरुवातीला इराणने इस्त्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माध्यमातून हल्ला चढवला. त्याच्या प्रत्युत्तरात इस्त्रायलने इराणच्या मिलिटरी बेस आणि अणुविज्ञान संशोधन केंद्रांवर लक्ष केंद्रित करत हवाई हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये इराणमधील इस्फहान आणि तेहरान परिसरात स्फोटांचे सत्र सुरू झाले. काही वेळातच इराणने पुन्हा प्रतिहल्ला करत इस्त्रायलच्या सीमावर्ती भागात लक्ष्य साधले. हजारो नागरिक धास्तावले या सततच्या हल्ल्यांमुळे दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. अनेक ठिकाणी शाळा बंद ठेवण्यात आल्या असून, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले जात आहे. युनेस्को आणि रेड क्रॉससारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी मानवीय संकट वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाची चिंता अमेरिका, रशिया, युरोपियन संघ तसेच संयुक्त राष्ट्रांनी या संघर्षाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले असून,







दोन्ही देशांवर तात्काळ युद्धविराम स्वीकारण्याचा दबाव वाढवला जात आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान बेन्यामिन नेतन्याहू यांनी म्हटले आहे की, "आमच्यावर कोणताही हल्ला सहन केला जाणार नाही. आमच्या देशाच्या सुरक्षिततेसाठी आम्ही ठोस पावले उचलणार आहोत." दुसरीकडे, इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खोमेनी यांनी इराणच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला असह्य असल्याचे सांगत पुढील कारवाईचा इशारा दिला आहे.

परिणाम आणि पुढील दिशा हा संघर्ष आता पूर्ण युद्धाच्या उंबरठ्यावर असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. संपूर्ण मध्य पूर्व क्षेत्रातील स्थैर्यावर याचा परिणाम होण्याची भीती असून, पेट्रोलियम पुरवठ्यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मध्यस्थीची मागणी जोर धरत आहे. इस्त्रायल आणि इराणमध्ये जवळपास एका आठवड्यापासून जरोदार संघर्ष सुरू आहे. इस्त्रायलकडून सातत्याने इराणच्या तेहरान या शहरात विविध भागांवर हवाई हल्ले करण्यात येत आहेत. या संदर्भात चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी मंगळवारी म्हटलं की, "इराण-इस्रायल संघर्षावरून मध्य पूर्वेतील तणावात अचानक वाढ झाल्यामुळे चीन खूप चिंतेत आहे. शी जिनपिंग यांनी इतर देशांच्या सार्वभौमत्वाचे, सुरक्षिततेचे आणि प्रादेशिक अखंडतेचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही कृत्यांना चीनचा विरोध पुन्हा एकदा स्पष्ट केला. लष्करी संघर्ष हा उपाय नाही आणि प्रादेशिक तणाव वाढवणं आंतरराष्ट्रीय समुदायाच्या सामान्य हिताचे नाही", असं ते म्हणाले असल्याचं वृत्त समोर आलं आहे.

### इराणचा इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला

इस्त्रायल आणि इराणमध्ये जवळपास एका आठवड्यापासून जरोदार संघर्ष सुरू आहे. इस्त्रायलकडून सातत्याने इराणच्या तेहरान या शहरात विविध भागांवर हवाई हल्ले करण्यात येत आहेत. आता इराणी सैन्याने तेल अवीवमधील इस्रायली लष्करी गुप्तचर केंद्रावर हल्ला केल्याचे म्हटले FVआहे. झिओनिस्ट राजवटीच्या गुप्तचर केंद्रावर त्याच्या गाभ्यामध्ये मार्गदर्शित क्षेपणास्त्राने हल्ला करण्यात आला," असे इराणच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते रेझा लाई-निक म्हणाले.

# दोन्ही 'राष्ट्रवादी'त तिसऱ्यांदा झुंज!

## 'माळ' कोणाच्या गळ्यात? अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामतीतील राजकारणाचे सत्ताकेंद्र असलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या रिंगणात उपमुख्यमंत्री अजित पवार उभे राहिले असून, कारखान्याच्या अध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून त्यांनी स्वतःचेच नाव जाहीर केले आहे.**

युवा नेते युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पॅनलही निवडणुकीत उतरल्याने लोकसभा आणि विधानसभेनंतर बारामतीत तिसऱ्यांदा दोन्ही 'राष्ट्रवादी' झुंजणार आहेत.अजित पवार यांच्या नेतृत्वाचा कस लावणारी ही निवडणूक युगेंद्र पवार यांच्या उभरत्या नेतृत्वाची परीक्षा घेणारी ठरण्याची शक्यता आहे. या कारखान्यासाठी पहिल्यांदाच चौरंगी लढत होत असून, विरोधकांकडून करण्यात येणारी टीका आणि आरोपांना उत्तर देताना अजित पवार यांची दमछाक होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. बारामतीतील राजकारणाच्या दृष्टीने माळेगाव सहकारी साखर कारखाना हा महत्त्वाचा मानला जातो. आजवर या कारखान्यावर पवार कुटुंबाचे वर्चस्व राहिले आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी या निवडणुकीत ब गटातून उमेदवारीअर्ज दाखल केला असून, अध्यक्षपदासाठी स्वतःच्या नावाची घोषणा केली आहे. अजित पवार यांनी या निवडणुकीला कमालीचे महत्त्व दिल्याने इंदापूरमधील श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीत तटस्थ राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने या निवडणुकीत भाग घेण्याचा निर्णय घेतला. युवा नेते युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविण्यात येत आहे. त्यामुळे अजित पवार आणि युगेंद्र पवार हे दुसऱ्यांदा, तर दोन्ही 'राष्ट्रवादी' तिसऱ्यांदा समोरासमोर आले आहेत.सध्या उपमुख्यमंत्री पवार यांच्या ताब्यात हा कारखाना आहे. या कारखान्याची सूत्रे हाती ठेवण्यासाठी अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. या कारखान्याचे १९ हजार ६०० सभासद असून, २२ जून रोजी होणाऱ्या मतदानात हे मतदार कोणाच्या हाती सूत्रे द्यायची, हे निश्चित करणार आहेत. उपमुख्यमंत्री पवार हे स्वतः रिंगणात उतरल्याने त्यांच्या दृष्टीने आरपारची लढाई असून, २४ जून रोजी होणाऱ्या निकालाकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. या कारखान्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे 'श्री नीळकंठेश्वर पॅनेल', राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे 'बळीराजा सहकार बचाव पॅनेल', कारखान्याचे माजी अध्यक्ष, भाजपचे नेते चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांचे 'सहकार बचाव शेतकरी पॅनेल' आणि कष्टकरी शेतकरी संघर्ष समितीचे पॅनेल यांच्यात चौरंगी लढत होणार आहे. अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पॅनलबरोबरच पारंपरिक विरोधक तावरे यांच्याशीही लढा द्यावा लागत असल्याने सध्या ते कोंडीत सापडले आहेत. त्यातून सुटका करण्यासाठी प्रचारासाठी ते स्वतः उतरले आहेत. 'बळीराजा सहकार बचाव पॅनेल'च्या प्रचाराचा प्रारंभ खासदार सुप्रिया सुळे आणि युवा नेते युगेंद्र पवार यांच्या उपस्थितीत पणदरे येथून करण्यात आला असून, युगेंद्र पवार यांनीही भेटीगाठींवर जोर दिला आहे.

### आर्थिक स्थिती चांगली नाही

या कारखान्याच्या २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकीत चंद्रराव तावरे यांच्या पॅनेलने अजित पवार यांच्या पॅनलला धक्का देऊन कारखान्याची सत्ता हस्तगत केली होती. मात्र, २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत अजित पवारांनी सत्ता खेचून आणली. त्यानंतर गेल्या पाच वर्षांत पवार यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कामकाजावरून तिन्ही विरोधी पॅनेलने अजित पवार यांना 'लक्ष्य' केले आहे. त्यांच्याकडून करण्यात येणारी टीका आणि आरोपांना उत्तरे देताना अजित पवार यांची दमछाक होत आहे. अजित पवार यांच्याकडे १४ कारखाने आहेत आणि हा कारखानाही ते खासगी करणार, असा आरोप करण्यात येत आहे. कारखान्याची आर्थिक स्थिती चांगली नाही.

# शरद पवार गटाचे गव्हाणे स्वगृही परतले

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित गव्हाणे यांच्यासह एकूण ३७ माजी नगरसेवकांनी अजित पवारांच्या उपस्थित राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. अजित गव्हाणे यांनी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला होता. विरोध असताना उमेदवारी मिळवली होती. परंतु, त्यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला. तेव्हा पासून ते पुन्हा स्वगृही परतणार असल्याची जोरदार चर्चा होती.**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत अजित गव्हाणे यांच्यासह एकूण ३७ माजी नगरसेवकांनी पक्षप्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित गव्हाणे यांनी काही माजी नगरसेवकांसह शरद पवारांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला होता. विधानसभा निवडणुकीदरम्यान वातावरण निर्मिती केली होती. अजित गव्हाणे हे भोसरीचे सध्याचे आमदार महेश लांडगे यांचा पराभव करतील असा विश्वास व्यक्त केला जात होता. परंतु, त्यांचा विधानसभा निवडणुकीमध्ये पराभव झाला. यानंतर ते पुन्हा अजित पवारांसोबत येणार असल्याचं बोललं जात होतं.शरद पवारांच्या पक्षात ते ॲक्टिव्ह नव्हते. वारंवार त्यांच्यावर टीका देखील केली जात होती. अखेर त्यांनी ३७ माजी नगरसेवकांसह अजित पवार गटात प्रवेश केला आहे. पुन्हा एकदा अजित पवारांनी शरद पवार गटाला धक्का दिला आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत अजित गव्हाणे यांच्यासह एकूण ३७ माजी नगरसेवकांनी पक्षप्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित गव्हाणे यांनी काही माजी नगरसेवकांसह शरद पवारांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला होता. विधानसभा निवडणुकीदरम्यान वातावरण निर्मिती केली होती. अजित गव्हाणे हे भोसरीचे सध्याचे आमदार महेश लांडगे यांचा पराभव करतील असा विश्वास व्यक्त केला जात होता. परंतु, त्यांचा विधानसभा निवडणुकीमध्ये पराभव झाला. यानंतर ते पुन्हा अजित पवारांसोबत येणार असल्याचं बोललं जात होतं.शरद पवारांच्या पक्षात ते ॲक्टिव्ह नव्हते. वारंवार त्यांच्यावर टीका देखील केली जात होती. अखेर त्यांनी ३७ माजी नगरसेवकांसह अजित पवार गटात प्रवेश केला आहे. पुन्हा एकदा अजित पवारांनी शरद पवार गटाला धक्का दिला आहे. अजित गव्हाणे यांच्यासह एकूण ३७ माजी नगरसेवकांनी अजित पवारांच्या उपस्थित राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. अजित गव्हाणे यांनी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला होता. विरोध असताना उमेदवारी मिळवली होती. परंतु, त्यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला. तेव्हा पासून ते पुन्हा स्वगृही परतणार असल्याची जोरदार चर्चा होती.

### 37 माजी नगरसेवकांनी पक्षप्रवेश केला

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत अजित गव्हाणे यांच्यासह एकूण ३७ माजी नगरसेवकांनी पक्षप्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित गव्हाणे यांनी काही माजी नगरसेवकांसह शरद पवारांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला होता. विधानसभा निवडणुकीदरम्यान वातावरण निर्मिती केली होती.

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चेवर 'फुलस्टॉप'

# सत्तेसाठी भाजपसोबत जाणाऱ्यांची साथ नकोच : शरद पवार

## पिंपरी चिंचवडमधील मेळाव्यात शरद पवारांचे संधीसाधूना खडे बोल

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।



**सत्तेसाठी भाजपसोबत जाणाऱ्यांची साथ नकोच, त्यांना पुन्हा पक्षात स्थान नाहीच, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी मंगळवारी स्पष्ट केले. संधीसाधूपणाचे राजकारण आपल्याला करायचे नाही, त्या दिशेने आपल्याला पावले टाकायची नाहीत असेही पवार यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चेला पूर्णविराम मिळाले आहे.**

आगामी पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने ताथवडे येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शरद पवार बोलत होते. शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत तसेच पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शरद पवार यांनी पक्ष बदलणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर खरमरीत टीका केली. शरद पवार म्हणाले सगळ्यांना बरोबर घेतले पाहिजे, असे वारंवार म्हटले जात आहे. पण सगळे म्हणजे कोण? गांधी, नेहरु, फुले, शाहू, आंबेडकर विचारांचे असले तर त्यांना सोबत घेऊ. पण जे सत्तेसाठी भाजपसोबत गेले, ही भूमिका कोणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा नाही. कुणाशीही संबंध ठेवा पण भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असू शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधीसाधूपणाचं राजकारण आपल्याला करायचं नाही.

आगामी पालिका निवडणुकीसाठी नव्या नेतृत्वाची फळी निर्माण करावी लागणार आहे. असे सांगताना शरद पवार म्हणाले या नव्या फळीच्या मार्फत आपल्याला बदल घडवावा लागेल. जे गेले त्यांची चिंता करू नका. मी असे अनेक प्रसंग पाहिले आहेत. माझ्यासोबतच्या अनेक सहकाऱ्यांनी साथ सोडली, पण ज्या-ज्यावेळी असं घडलं, तेव्हा मी चिंताग्रस्त झालो नाही. मला कार्यकर्त्यांनी खंबीर साथ दिली आणि जनतेने पाठिंबा दिला. त्यानंतरही मी सत्तेत आलेलो आहे. त्यामुळे कोण आला, कोण गेला याची चिंता करु नका. लोक शहाणे आहेत, आज ही लोकशाही जनतेच्या शहाणपणाने टिकलेली आहे. ती यापुढं ही टिकून राहणार आहे, असे शरद पवार यांनी सांगितले.

### महापालिका निवडणुकीची चिंता सोडा

तुम्ही निवडणुकीची काळजी करु नका. आपल्यासोबत जो येणार असेल, ते आपल्या विचारांशी जोडून राहणार असतील तर त्यांचा विचार वरिष्ठ करतील. मी तुम्हाला विश्वास देतो. आगामी महापालिका निवडणुकीबाबत तुम्ही चिंताच करू नका, असे सांगत शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना धीर देत त्यांना लढण्यासाठी बळ देण्याचा प्रयत्न केला.

### जुनी अनधिकृत बांधकाम टिकायला हवीत

रांजणगावला ही आम्ही औद्योगिक नगरी बनवलं. चाकण, बारामती, इंदापूर, अशा अनेक ठिकाणी औद्योगिक पट्टा निर्माण केला. पिंपरी चिंचवडच्या आजूबाजूला हे औद्योगिक आणण्यासासाठी आम्ही झटलो. आज स्थिती वेगळी आहे. आता इथलं राजकारण, समाजकारण बदललं आहे. इथलं नेतृत्व अण्णासाहेब मगर, मग आम्ही, त्यानंतर रामकृष्ण मोरे यांनी या शहराचा चेहरा बदलण्यासाठी कष्ट घेतले. यामागे गांधी-नेहरूंचे विचार महत्वाचे ठरले. त्यांनी विकासाची गंगा आणली अन हीच विकासाची गाडी आपल्याला पुढं न्यायची आहे. जी अनधिकृत बांधकाम आहेत, ती टिकायला हवीत. नव्यानं अनधिकृत बांधकामे होऊ देऊ नका, पण जी पूर्वी झालीत ती टिकायला हवीत. रस्त्याच्या पलीकडे एक अन अलीकडे एक असा एक नवा व्यवसाय पिंपरी चिंचवडमध्ये सुरु झाला. हा व्यवसाय आपल्याला स्वच्छ

## कुंडमळा दुर्घटनातील दोंषीवर कारवाई करणार : अजित पवार

## कुंडमळा दुर्घटनेतील जखमींची रुग्णालयात जाऊन घेतली भेट

।लोणावळा ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे रविवारी १५ जूनला झालेल्या इंद्रायणी नदीवरील पुल दुर्घटनेत चार पर्यटकांचा मृत्यू झाला होता. तर अनेक पर्यटक जखमी झाले होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी दुपारी कुंडमळा दुर्घटनेतील जखमींची रुग्णालयात जाऊन भेट घेत घटनेची माहिती घेऊन दुर्घटनेत जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.**




यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,आमदार सुनील शेळके, मावळ मुळशीचे उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले,तहसीलदार विक्रम देशमुख,आरोग्य अधिकारी सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी व नागरिक उपस्थितीत होते.

यावेळी अजित पवार यांनी बोलतांना सांगितले कि, कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्यांची घटना दुर्दैवी असून यामधील मृत पावलेल्याच्या नातेवाईकांना शासनाकडून मदत जाहीर केली आहे. यावेळी जे पर्यटक जखमीं झाले आहे. त्याचा हि खर्च शासन करत आहे. नव्याने पुल उभारण्यात जे तांत्रिक अडचणी आहेत. या संदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सूचना देत त्या तत्काळ दूर करून पुलाच्या उभारणीचा मार्ग सुकर करा. अशा सूचना दिल्या. येत्या काही दिवसांत पुलाच्या उभारणीला सुरूवात केली जाईल. तसेच यासह इतर पर्यटन स्थळांवर पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना धोकादायक ठिकाणी जाण्यास प्रतिबंधात्मक उपाय व सुचना फलक लाऊन जनजागृती करण्यात येईल. कुंडमळा पुल दुर्घटनेत जे जे कोण दोषी असतील त्याची चौकशी सुरू केली असून त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्याच्या वर कडक कारवाई करणार असल्याचे यांनी सांगितले आहे.

# दोन्ही ठाकरेंनी मारली कलटी, विलिनीकरणाचा टांगा पलटी !

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचाच्या गडबडीतच परमार्थ साधावा.

कोर्टातली शपथ ज्याप्रमाणे लोक खरी मानत नाहीत, त्याप्रमाणे प्रपंचात काही लोक लबाडीने वागतात आणि त्याला ' हा व्यवहार आहे ' असे म्हणतात; हा काही नेटका प्रपंच नव्हे. प्रपंचात जर समाधान झाले नाही, तर तो नेटका नाही झाला. प्रपंचाची दिशा ज्याची चुकली, त्याने नाही परमार्थ साधला. ज्याला प्रपंच करता येत नाही, त्याला बुवापणाही नाही करता येणार ! कर्ज फार झाले म्हणून प्रपंच सोडला, यात कोणता स्वार्थत्याग आहे ? प्रपंचाचा त्याग केला म्हणजे काय केले, तर जंगलात जाऊन बसला. थंडी वाजू लागली तेव्हा काटक्या गोळा करून शेकोटी केली. जागा साफ केली, तुळशी लावल्या, झोपडी बांधली. पण भिक्षेला जाताना झोपडीची काळजी केली, तर मग घरादारानेच काय केले होते ? प्रपंचाचे बंधन सुटावे लागते; जबरदस्तीने सोडून कुठे सोडता येते ? हा प्रपंच, हा संसार जर भगवंतानेच उत्पन्न केला आहे, तर तो कुणाला तरी सुटेल काय ? जो आसक्तीच्या आश्रयाखाली राहतो त्याला संसार आहे असे समजावे. तुकोबांना आणि ज्ञानेश्वमहाराजांनासुद्धा संसार, प्रपंच होता; पण त्यामध्ये त्यांची आसक्ती नव्हती, म्हणून त्यांना तो बाधला नाही.

पेन्शन घेतल्यावर परमार्थ करू, हे म्हणणे बरोबर नाही. या गडबडीतच, प्रपंचाच्या झटापटीतच परमार्थ साधावा. सावधानता कशाची ठेवायची ? तर मी जन्माला आलो तेव्हा जे कबूल केले, ते करण्याची सावधगिरी ठेवायची. प्रपंच करताना लक्ष भगवंताकडे ठेवा. विषयात गुंग झालो, भगवंताचा विसर पडू लागला, ही संधी साधावी आणि त्या वेळी भगवंताचे स्मरण ठेवावे. आपण विषयाला जसे शरण गेलो तसे भगवंताला शरण जावे. चित्त शुद्ध करून विचार करावा, आणि मी विषयाला किती शरण गेलो हे पहावे. विषयापासून वेगळे व्हावे, म्हणजे हे पाहता येते. व्यसनी माणसाने, व्यसनापूर्वी मी कसा वागत होतो याचा विचार करावा. मारुतिरायाच्या दर्शनाला पूर्वी मी जात होतो, आता विषयात त्याची आठवणही येत नाही, याला काय करावे ? नोकरीत नाही का तुम्ही वरिष्ठाला शरण जात ? मग जे पोटाकरता करता ते भगवंताकरता का नाही करीत ? भगवंताला शरण जाणे सर्वांत सोपे आहे; त्याला निराळ्या कोणत्याही वस्तूची जरुरी नाही लागत. माझ्या मनात येईल तेव्हा भगवंताला शरण जाता येईल. भगवंताला शरण जाणे म्हणजे ' मी त्याचा झालो ' असे म्हणणेच होय. ' मी रामाचा झालो, जे जे होते ते रामइच्छेने होते ' असे जो म्हणतो त्याला निराळी सावधगिरी ठेवावी लागत नाही.

**बोधवचन:- प्रपंचाला 'माझी' गरज आहे, आणि 'मला' भगवंताची गरज आहे.**



## 'स्टेट'मेंट

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**उद्धव आणि राज ठाकरे यांचे एकत्रीकरण किंवा विलीनीकरण होणार, या हालचालींमुळे त्यांच्या मते मराठी माणसाला आणि महाराष्ट्राला एकदम उत्साह आला होता. अर्थात, त्याला दुजोरा देणारे फक्त उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत हेच होते ! प्रत्यक्षात, महाराष्ट्राला किंवा मराठी माणसाला असे काहीच वाटत नव्हते. कारण, ते दोघे एकत्र येतील यावरच आता कुणाचा विश्वास उरलेला नाही!**

### ठाकरे बंधू मात्र खुश !

दोघे एकत्र आल्यामुळे ठाकरे ब्रँड पुन्हा एकदा खुलणार आणि फुलणार या कल्पनेने ठाकरे बंधू आणि त्यांचे जवळचे मित्र जाम खुश झाले असावेत. आपल्या एकत्र येण्याच्या संदर्भात जगभर एवढी चर्चा होते आहे, हे बघून या खुशीत भर पडली असावी. मिश्किली हा ठाकरे घराण्याचा 'इनबिल्ट' गुण आहे. शब्दांचे फटकारे वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे होते आणि हे फटकारे आणि त्यांचे एकंदर दिलखुलास व्यक्तिमत्त्व यामुळे महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला देखील भुरळ पडली होती हा इतिहास आहे.

### बाळासाहेबांना खुर्चीचा मोह नव्हता !

बाळासाहेब ठाकरे यांना खुर्चीचा मोह असता तर १९९६ मध्ये 'युती' ची सत्ता आली, तेव्हा त्यांना मुख्यमंत्री होणे अवघड नव्हते. तिकडे आंध्र प्रदेशात केवळ आपल्या लोकप्रियतेच्या आधारे एन. टी. रामाराव मुख्यमंत्री झाले होतेच ना!

### सध्याच्या ठाकरे ब्रँडची ताकद

सध्या उद्धव आणि राज या बंधूंची एकूण ताकद किती हो? विधानसभेचे आमदार 20 अधिक 0 अशा जागा आहेत. लगेचच या जागांच्या आधारे राज्यात कोणतीही राजकीय क्रांती अपेक्षित नाही. शिवाय अशा एकत्र येण्याची चर्चा हे कोणीतरी सोडून दिलेले 'पिल्लू' आहे, हे स्पष्ट दिसते. दोन दिवसांपूर्वी राज ठाकरे मोटारीत बसून निघाले, तेव्हा तिथे उपस्थित वाहिनीच्या पत्रकाराने त्यांना विचारले, कुठे दौरा? तेव्हा 'मातोश्री' वर चाललो आहे असे टणाटण उत्तर राज ठाकरे यांनी दिले. अर्थात ते ऐकणारे आणि बघणारे रिकामटेकडे असतातच.



आपले अजय - अतुल म्हणतात, की त्यांनी व्यायाम करायला माणसे ठेवली आहेत. तसे काही दारुबाज म्हणतात, की कोणी आग्रह केला तरच आम्ही पितो.. आणि त्यांनी आग्रह करायला माणूस ठेवला आहे वगैरे..

### घोड्यावर बसवणारे बरेच..

सध्या, घोड्यावर बसवणारे लोक बरेच झाले आहेत आणि ठाकरे बंधू आणि गांधी घराण्याचे राजपुत्र यांना घोड्यावर बसविण्याचा उद्योग सुरु आहे. राजकारणात धक्के देणारे पक्ष आणि नेते यशस्वी होतात. अशी धक्का देण्याची कला शरद पवार यांना अवगत आहे. काही वर्षांपूर्वी त्यांनी आनंद परांजपे यांना असेच अनपेक्षितपणे मूळच्या शिवसेनेतून उचलून मूळच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आणले होते, छगन भुजबळ नाही तसेच उचलले होते. तेव्हा ती बातमी गाजली होती. ठाकरे बंधू यांनी अशीच अगोदर चर्चा करुन जर ऐक्याची किंवा युती - आघाडीची घोषणा केली, असती तर कदाचित धमाका झाला असता. पण, दोन महिने होणार होणार अशी चर्चा करुन निष्पन्न काही नाही आणि अनेकांचा वेळ मात्र फुकट गेला आहे हे मान्यच करावे लागेल.

### पुण्याईवर जिंकण्याचे दिवस संपले..

आता पूर्वजांच्या पुण्याईवर राजकारण करण्याचा काळ नाही. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची पुण्याई मोठी आहे, यात वाद नाही, पण या पुण्याईचे वाटप झाले आहे. आता नव्या पिढ्यांना त्या आधारे फारसे काही करता येईल, असे दिसत नाही. राज ठाकरे गर्दी जमवतात पण, मते मिळत नाहीत, हे शरद पवार यांचे एक वाक्य बरेच काही सांगून जाते. उद्धव ठाकरे गर्दीचे रुपांतर मतांमध्ये करु शकतात, हे वाक्य देखील पवार यांचेच आहे. पण, बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात शिवसेनेची पोहोच मुंबई, ठाणे, कोकण, मराठवाडा अशा ठिकाणी होती, तिथे आता विभाजन झाले आहे. आणि उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाची अवस्था खेड्यापाड्यात अनेक गावांमध्ये फिरुन संध्याकाळी डेपोत येणाऱ्या एसटी सारखी करुन घेतली आहे. म्हणजे, काल ती ठाण्याला गेली असेल तर आज सकाळी मुरबाड गावात देखील जाऊ शकते आणि राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाची परिस्थिती भाडे नाकारणाऱ्या रिक्षासारखी केली आहे. रिक्षा छान सजलेली आहे पण, ड्रायव्हर नुसता बसून आहे. कुठे जायलाच नको म्हणतो! थोडक्यात दोन्ही ठाकरेंचे पक्ष सध्या तरी बिनकामाचे दिसतात.

### दोन्ही फुगे.. फुस्सस !

थोडक्यात, दोनही फुग्यांमधील हवा कमी झाली आहे. त्यात हवा भरण्याचे काम वाहिनीवाले करत आहेत. काजळून काळ्याकुट्ट झालेल्या भांड्याला कितीही कल्हई लावली, तरी ती चकाकत नाही हे साधे तत्त्व आहे. ज्यांना राजकीय अभ्यास करायचा आहे, त्यांनी ही वस्तुस्थिती जाणून घ्यायला हवी. दोन ठाकरे हे महाराष्ट्रातील राजकारणात महत्त्वाचे असले, तरी ते अनेक प्रवाहांपैकी आहेत.

### चंद्राबाबूंचे उदाहरण..

आंध्र प्रदेशात २०१९ च्या निवडणुकीत चंद्राबाबू नायडू यांच्या पक्षाला वीस जागा देखील मिळाल्या नव्हत्या. पण, पाच वर्षांनी दीडशेहून अधिक जागा घेऊन ते सत्ताधारी झाले आहे. उलट, जगनमोहन रेड्डी दीडशे जागांवरुन पंधरा जागांवर आले आहेत. ठाकरे बंधू असे काही करणार असतील आणि महाराष्ट्रात सगळीकडे दौरे करुन पायाभरणी करणार असतील, तर त्यासाठी मोठी योजना तयार करावी लागेल. संजय राऊतांची दैनंदिन टकळी आणि सो कॉल्ड अग्रलेख यातून महाराष्ट्रात काही राजकीय क्रांती होईल, अशी अपेक्षा मोबाईल पत्रकारांनी करु नये. 'कुछ अच्छा दिखाओ भाई', हवा कमी झालेल्या फुग्यांत पुन्हा हवा भरता येत नाही आणि खेड्यापाड्यात पडवीत असलेल्या चुलीतील विस्तव नुसती फुंकणी मारुन फुलवता येत नाही. पुन्हा सगळे सोपस्कार करावे लागतात. तुम्ही एकत्र आलात, तर कोणाचा विरोध नाही, पण एकत्र याच असा आग्रह अजिबात नाही. ठाकरे कोणाचे ऐकतात का ? त्यांना हवे तेच करतात. ठाकरे ब्रँड नव्याने उभारण्याच्या नादात 'टांगा पलटी' झाला आहे, हे अजून कसे लक्षात येत नाही ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक ः MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक ः वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक ः सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.



## भूमिका

**‘डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेण्ट ऑर्गनायझेशन’ (डीआरडीओ), भारत ‘इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड’ (बीईएल), ‘इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन’ (इस्रो) आणि भारतीय सशस्त्र सैन्यदले यांनी मिळून आत्मनिर्भर, अत्याधुनिक आणि स्वतंत्र आकाश-तीर एक “रियल-टाईम टारगेटिंग आणि इंटरसेप्शन सिस्टिम” तयार केली आहे.**

# ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये मोलाची कामगिरी



भारताच्या या यंत्रणेने आधुनिक युद्धाचे तंत्रच बदलून टाकले आहे. इस्रोच्या उपग्रहांचे जाळे, भारतीय-जीपीएस नाविकचे अचूक मार्गदर्शन आणि स्वतंत्र स्टेल्थ (शत्रूच्या रडार्सना अदृश्य असलेल्या) ड्रोन्स (ऑटोनॉमस स्टेल्थ ड्रोन्स) यांच्यावर आधारित, आकाश-तीरने आधुनिक युद्ध-तंत्रामध्ये जबरदस्त सुधारणा तर केलीच, शिवाय ‘ऑपरेशन-सिंदूर’ मध्ये भारताला लक्षणीय यश प्राप्त करून दिले.कारगिल युद्धावेळी, अमेरिकेने उपग्रहांचे जीपीएस सिग्नल्स बंद केले. त्यामुळे भारतीय सशस्त्र सेनादलांना ते युद्ध जीपीएसशिवाय लढावे लागले होते. त्या अनुभवातून भारताने धडा घेतला. २०१४ नंतर संशोधनाला गती मिळून, भारताने इस्रोद्वारे अवकाशात स्वतःच्या उपग्रहांचे स्वतंत्र जाळे निर्माण केले आणि त्यावर आधारित आत्मनिर्भर भारतीय-जीपीएस प्रणाली, नाविक निर्माण केली. अमेरिका आणि रशियाच्या उपग्रहांच्या फ्रिक्वेन्सीज जगात सर्वांना माहीत आहेत. मात्र भारतीय उपग्रहांच्या फ्रिक्वेन्सी गुप्त असून, त्या हव्या तेव्हा बदलण्याची सोयही आहे. नाविकची अचूक नेव्हिगेशन (मार्गदर्शन) पद्धती आकाश-तीरच्या स्टेल्थ-ड्रोन्सना त्यांच्या लक्ष्यापर्यंत १५ सेंटिमीटर्सच्या अचूकतेने पोहोचविते.इस्रायलचे आयर्न-डोम आणि बराक, चिनी एचक्यू-९, तसेच अमेरिकेची इंटिग्रेटेड एअर कमाण्ड आणि मिसाईल डिफेन्स बॅटल कमाण्ड सिस्टिम यांना तुल्यबळ, भारताचा आकाश-तीर आहे.

नाटोचा सदस्य नसलेल्या, एका प्रगतीशील पौर्वात्य देशाने प्रथमच पूर्णतः देशी बनावटीची उपग्रह-नेव्हिगेशन पद्धती विकसित केली आहे. ही पद्धत एआय वापरणारी, स्वयंपूर्ण, बदलणाऱ्या युद्धस्थितीवर मात करू शकणारी आणि अकाशावर प्रभुत्व ठेवणारी आहे.भारतीय सेनेच्या वायू-रक्षा पद्धतीतील आणि भारतीय वायुसेनेच्या इंटिग्रेटेड एअर कमांड अँड कन्ट्रोल सिस्टिम (आयएससीसीएस) चा भाग असलेली आकाश-तीर ही विविध-स्तरांवर कार्य करणारी, स्वसंरक्षण करून शत्रुराष्ट्राच्या शस्त्रास्त्रांना निकामी करू शकणारी स्वयंचालित अमोघ शक्ति असून, ती पुढील तत्वे वापरते:इस्रोचे उपग्रह रणांगणावर सतत सर्वत्र नजर ठेवतात. पारंपरिक पद्धतीमध्ये लक्ष्यासंबंधीची माहिती त्यावर काही कृती करेपर्यंत जुनी होते. इस्रोच्या CARTOSAT आणि RISAT या उपग्रह-प्रणालींतून आलेली त्या क्षणाची माहिती वापरल्याने आकाश-तीरला पृथ्वीतलानुसार सद्यस्थितीतील लक्ष्यावर त्वरित हल्ला करता येतो. विदेशी उपग्रहांपेक्षा, स्वदेशी उपग्रह जास्त कार्यक्षम ठरले आहेत. नाविक- जमीन डोंगराळ असो किंवा वाळवंट असो, कमाल-अचूकता देणारा भारताच्या स्वतःच्या उपग्रहांचा संच आहे. दक्षिण-आशियामध्ये तो पाश्चात्य-जीपीएसपेक्षा जास्त विश्वसनीय आहे. शिवाय स्थानिक नाविक-मार्गदर्शक-प्रणाली अमेरिकेच्या किंवा चिनी जीपीएस-मार्गदर्शक प्रणालीपेक्षा जास्त प्रभावी ठरते. आकाश-तीरच्या प्रत्येक ड्रोनचे वैशिष्ट्य असे की ते पाच ते दहा किलोग्रॅम्स शस्त्रास्त्रे वाहून नेऊ शकतात. जमिनीपासून कमी उंचीवरून उडतात आणि रडार्सना न दिसण्याचे तंत्र वापरू शकतात. ऐनवेळी लक्ष्यांमध्ये बदल केले तरी, स्वत: मार्ग काढू शकतात. पारंपरिक चिनी आणि पाकिस्तानी रडार्सना हे ड्रोन दिसू शकत नाहीत. प्रत्येक ड्रोनची रचना युद्धातील कामिकाझे हल्ल्यासाठी केलेली आहे. प्रत्येक ड्रोन शत्रूला चाहूल लागू न देता, टेहळणी आणि मारा करून, दिलेले लक्ष्य नष्ट करू शकतो.एआय आणि स्वार्म कॉम्बॅट तंत्र वापरल्यामुळे विलंब होत नाही. कॉम्बॅट क्लाउड त्याच्या प्रक्रियेसाठी पुढील तंत्रांचा वापर करतो-आकाश-तीर नवी लक्ष्ये ठरवून, त्यांवर मिसाईल किंवा ड्रोन पाठवून, त्यांना नव्या सूचना देऊन, बदललेल्या मार्गावर काही सेकंदांत पाठवू शकतो.

## संपादकीय »

### व्रणांवर विजय!

***अजिंक्यपदाच्या लढतीमध्ये ऑस्ट्रेलियावर मिळवलेल्या विजयाकडे दुर्लक्ष झाले.***

विजय नेहमीसारखा ‘कोणी तरी जिंकणार – कोणी तरी हरणार...’ छापाचा नाही. तसे मानणे हा दक्षिण आफ्रिकेतील गौरेतरांचा अपमान ठरेल. दक्षिण आफ्रिकी संघ गेली कित्येक वर्षे मातबर म्हणून ओळखला जायचा. पण तो प्राधान्याने गोऱ्यांचा आणि गोऱ्यांकडूनच गौरवला गेलेला असा. पण त्या संघाला दिग्विजयी कधी बनता आले नाही. तो मान गौरेतरांचा सहभाग असलेल्या आणि एका गौरेतराच्या नेतृत्वाखालील संघाने पटकवला. यावर एका विजेतेपदाकडे अशा राजकीय नजरेने पाहू नये, असा सल्ला देणारे कोणी दिसले तर ते खचितच उच्चवर्णीय असतील. अशांच्या लबाड युक्तिवादाकडे दुर्लक्ष करून या विजयाचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक.या विजयी संघाचा कर्णधार तेम्बा बवुमा, हा अस्सल मातीतला आणि कृष्णवर्णीय दक्षिण आफ्रिकी. उंची साडेपाच फुटांपेक्षा जेमतेम अधिक. काळेपणाविषयी न्यूनगंड नाही आणि गोऱ्यांना परास्त केल्याचा निष्कारण भावनोत्कट अहंगंड नाही.

अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने मुली आणि स्त्रिया आता रस्त्यावर जवळपास दिसणारच नाहीत, असे कायदे केले आहेत. २१ ऑगस्ट रोजी ११४ पानांची एक पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली असून त्यात यासंदर्भात एकूण ३५ अनुच्छेद आहेत.

# चला, मूक अफगाण स्त्रियांचा आवाज बनूया



अफगाणिस्तानचे सर्वोच्च नेते मुल्ला हैबतुल्लाह अखुंडझादा यांनी या पुस्तिकेला मंजुरी दिली आहे. त्यानुसार स्त्रियांना रस्त्यावर जोरात बोलण्यास मनाई आहे. घराच्या बाहेर पडताना त्यांना चेहऱ्यासह सगळं शरीर झाकून घ्यावं लागेल. त्यांना गाणीही म्हणता येणार नाहीत. मुलींना सहावीपर्यंत शिक्षण घेता येईल, असा निर्णय आधीच घेण्यात आला आहे. पण त्यापलीकडे त्यांच्यासाठी बाहेरचं जग हा प्रकारच नाही. २००१ ते २०२१ या कालावधीत अफगाण स्त्रियांनी मिळवलेलं स्वातंत्र्य तालिबानच्या दुसऱ्या सरकारने संपवलं आहे. अफगाण स्त्रिया मात्र अशा स्वरूपाच्या बंधनाच्या विरोधात आहेत. त्यांनी तालिबान सरकारच्या ‘स्त्रियांविरोधी धोरणा’च्या विरोधात व्हिडीओ तयार करून ते समाजमाध्यमांवर टाकले आहेत आणि ते व्हायरल झाले आहेत. अर्थात ओळख जाहीर होणार नाही याची या व्हिडीओंमध्ये विशेष काळजी घेण्यात आली आहे.या स्त्रीविरोधी कायद्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. संयुक्त राष्ट्र (यूएन) आणि स्त्रियांच्या तसेच मानवाधिकारांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या विविध संघटनांनी त्यांचा निषेध केला आहे. २७ ऑगस्टला मानवाधिकार प्रश्नावरच्या संयुक्त राष्ट्राच्या उच्चायुक्तांनी अफगाण सरकारने हे कायदे तात्काळ मागे घेतले पाहिजेत, जागतिक समुदायाला ते मान्य नाहीत, असे म्हटले आहे. तालिबानने १५ ऑगस्ट २०२१ रोजी अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला, याला आता तीन वर्षे झाली आहेत. अफगाण स्त्रियांचे वेगवेगळे अधिकार तालिबानने काढून घेतले आहेत. तालिबान २.० च्या आधी अफगाण स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करत. काबूल येथे अफगाण स्त्रियांच्या एका कार्यशाळेत त्यांच्यातला उत्साह आणि देशाला दहशतवादापासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांची इच्छा मला जवळून पाहायला मिळाली होती. अश्रफ घनी राष्ट्राध्यक्ष असताना त्यांच्या पत्नीची (फर्स्ट लेडी) भेट घेतली तेव्हा २२ वर्षांच्या मशाल नावाच्या त्यांच्या सचिव मुलीची भेट झाली होती. अशा अनेक तरुण मुली परदेशात शिकून परतल्या होत्या. देशासाठी काहीतरी करायची त्यांची इच्छा होती. त्यांच्यातल्या बहुतेक जणी आता अफगाणिस्तानच्या बाहेर निघून गेल्या आहेत. बाहेर जायची इच्छा असलेल्या बऱ्याच जणी अफगाणिस्तानात अडकून पडल्या आहेत. त्याच या क्रूर राजवटीच्या विरोधात बोलत आहेत.अखुंडझादा यांनी ‘व्यभिचारा’च्या गुन्ह्यासाठी स्त्रियांना दगडाने ठेचून मृत्युदंड देण्याची मार्च महिन्यात घोषणा केली होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महायुतीतील मतभेदाचा दुसरा अंक!

## पालकमंत्र्यांच्या बैठकीस भाजप आमदारांची दांडी

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**तुळजापूर आराखड्यातील तुळजाभवानीचे शिल्प दशभुजाधारिणीम् करून तीच ‘भारतमाता’ आहे, असा उल्लेख शासकीय पत्रव्यवहारात आल्यानंतर धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मुंबईत मंगळवारी बोलावलेल्या बैठकीस तुळजापूरचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी दांडी मारली. दरम्यान, तुळजाभवानी मूर्तीचे रूप नव्या शिल्पातही आहे तसे कायम ठेवावे, तसेच विकास आरखड्यात पुजाऱ्यांचा सहभाग घ्यावा, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या आहेत.**



जिल्हास्तरीय बैठकीस राणाजगजीतसिंह पाटील यांची गैरहजेरी महायुतीतील मतभेदाचा दुसरा अंक असल्याचे मानले जात आहे. अलीकडेच प्रताप सरनाईक यांनी राणाजगजीतसिंह पाटील यांची मुख्यमंत्र्याकडे तक्रार केली होती. जिल्हा आराखड्यातील निधीस मंजुरी देताना आक्षेप न घेणाऱ्या आमदार पाटील यांनी अजित पवार यांच्याकडून निधीस स्थगिती मिळविली. त्यामुळे विकास प्रक्रियेवर परिणाम होत असल्याची तक्रार प्रताप सरनाईक यांनी केली होती.दरम्यान तुळजापूरच्या १८६५ कोटी रुपयांच्या आराखड्यातील कामे कशी व्हावीत, त्याचा वेग किती असावा, कोणती कामे कशी करावीत, याचा तपशील जाणून घेण्यासाठी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी मुंबईत बैठक बोलावली होती. या बैठकीत आराखडा तयार करणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन समितीच्या कंत्राटदाराने कोणती व कशी कामे केली जातील, याचे सादरीकरण जिल्हास्तरीय समितीसमोर केले. या वेळी तुळजाभवानी माता म्हणजे भारतमाता अशा पद्धतीने वापरल्या जाणाऱ्या शब्दांवर आक्षेप घेण्यात आला. ती जगदंबा असल्याने नवी प्रतिमा करू नये, असे सांगण्यात आले. तसेच ज्या वेगाने विकास आरखड्यातील कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत आणि त्याचा सध्याचा वेग लक्षात घेता कामे रेंगाळू नयेत, याची काळजी घेण्याचे निर्देश पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.या बैठकीस शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांचीही उपस्थिती होती. ते म्हणाले, ‘सध्या हा कारभार प्रकल्प व्यवस्थापन समिती आणि कंत्राटदार यांच्यामार्फत सुरू आहे. यामध्ये पुजाऱ्यांचा सहभाग वाढायला हवा, असे मत पालकमंत्र्यांकडे मांडले. त्यांनीही त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. तुळजाभवानी आणि भारतमाता या दोन स्वतंत्र प्रतिमा आहेत. त्यामुळे त्यावर काही जणांचे आक्षेप आहेत. त्यावरही या बैठकीत चर्चा झाली.’ येत्या साडेतीन वर्षांत तुळजापूर विकासाची सर्व कामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे पालकमंत्री सरनाईक यांनी सांगितले.श्रीक्षेत्र तुळजापूर विकास आराखड्यांतर्गत १०८ फुटांचे शिल्प उभारले जाणार आहे. या शिल्पामध्ये तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत असल्याचे दाखवण्यात आले आहे. परंतु हे दाखवत असताना भवानी मातेची प्रतिमा ही अष्टभुजाकृती दाखवण्यात आलेली आहे. संकेतस्थळावरील विकास आराखड्याच्या संकल्प चित्रातून ही प्रतिमा काढून टाकण्यात यावी, तसेच शिल्प तयार करताना पुरातत्त्व विभाग, इतिहास तज्ज्ञ व आनुषंगिक घटकांशी चर्चा करून देवीची प्रतिमा कशी असावी याबाबत निर्णय घ्यावा.

### 1865 कोटी आराखड्यातील कामे

याबरोबरच यापुढे विकास आराखड्यासंदर्भात प्रसिद्धीसाठी द्यावयाची पत्रे, परिपत्रके ही परस्पर न देता अध्यक्षांच्या अनुमतीनेच देण्यात यावीत, असे निर्देश त्यांनी धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले.जिल्हास्तरीय बैठकीस राणाजगजीतसिंह पाटील यांची गैरहजेरी महायुतीतील मतभेदाचा दुसरा अंक असल्याचे मानले जात आहे. अलीकडेच प्रताप सरनाईक यांनी राणाजगजीतसिंह पाटील यांची मुख्यमंत्र्याकडे तक्रार केली होती. जिल्हा आराखड्यातील निधीस मंजुरी देताना आक्षेप न घेणाऱ्या आमदार पाटील यांनी अजित पवार यांच्याकडून निधीस स्थगिती मिळविली. त्यामुळे विकास प्रक्रियेवर परिणाम होत असल्याची तक्रार प्रताप सरनाईक यांनी केली होती.दरम्यान तुळजापूरच्या १८६५ कोटी रुपयांच्या आराखड्यातील कामे कशी व्हावीत.

## फळपीक शेतकऱ्यांसाठी खूषखबर...

## फळपीक विमा योजनेला मिळाली मुदतवाढ

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. मृगबहारामधील पेरु, द्राक्ष, संत्रा, लिंबू फळपिकांचा विमा आता ३० जून २०२५ पर्यंत काढता येणार आहे.**



पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राज्यात मृग व आंबिया बहारामध्ये राबविण्यात येते. मृगबहारामध्ये संत्रा, पेरु, लिंबू , द्राक्ष या पिकांसाठी भाग घेण्याची अंतिम तारीख १४ जून २०२५ होती. पण, विमा योजनेत भाग घेण्यासाठी काही तांत्रिक अडचणीमुळे पीक विमा पोर्टल HTTP://WWW.PMFBY.GOV.IN १३ जून २०२५ रोजी सुरू झाले. वरील चार पिकांना भाग घेण्यासाठी अतिशय अल्प कालावधी मिळाला. त्यामुळे हा कालावधी वाढवण्यासाठी राज्याकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.या बाबत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केंद्राकडे पाठपुरावा केला. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने अनुमती दिली असून, आता या चार पिकांना विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम मुदत ३० जून २०२५ अशी राहील.

पेरू, लिंबू , द्राक्ष, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी वाढीव मुदतीचा फायदा घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री कोकाटे यांनी केले आहे.राज्यातील फळबाग लागवड, फलोत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीसाठी अनुदान दिले जाते. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना देखील आहे. ज्याद्वारे फळबाग लागवडीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. राज्यातील फलोत्पादन ज्यात ३५८ गावांचा समावेश आहे. फळबागांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते, रोजगार निर्मिती होते, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर होतो, राज्यात फळांचे उत्पादन वाढते, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी या योजना महत्त्वपूर्ण आहेत.

### अंतिम मुदत 30 जून 2025

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राज्यात मृग व आंबिया बहारामध्ये राबविण्यात येते. मृगबहारामध्ये संत्रा, पेरु, लिंबू , द्राक्ष या पिकांसाठी भाग घेण्याची अंतिम तारीख १४ जून २०२५ होती. पण, विमा योजनेत भाग घेण्यासाठी काही तांत्रिक अडचणीमुळे पीक विमा पोर्टल HTTP://WWW.PMFBY.GOV.IN १३ जून २०२५ रोजी सुरू झाले. वरील चार पिकांना भाग घेण्यासाठी अतिशय अल्प कालावधी मिळाला. त्यामुळे हा कालावधी वाढवण्यासाठी राज्याकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.या बाबत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केंद्राकडे पाठपुरावा केला. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने अनुमती दिली असून, आता या चार पिकांना विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम मुदत ३० जून २०२५ अशी राहील.

# इराण-इस्रायल संघर्ष विकोपाला!

## ट्रम्प यांनी खामेनी यांच्याबाबत सर्वात मोठं विधान केलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष आणखी वाढला आहे. दोन्ही देशांकडून मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले सुरु आहेत. इस्त्रायलने इराणमधील तेहरानला टार्गेट केलं आहे. दुसरीकडे इराणनेही इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले केले आहेत. इस्त्रायलने इराणचे तेल डेपो लक्ष्य करत मोठे हवाई हल्ले केल्यामुळे संघर्ष वाढला. इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात इराणच्या प्रमुख लष्करी कमांडरचा देखील खात्मा झाला. त्यामुळे इराणला मोठा धक्का बसला आहे.**



या दोन्ही देशातील तणाव वाढलेला असताना अमेरिकेकडून या संघर्षाला इराणलाच जबाबदार ठरवण्यात येत आहे. यातच आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्याबाबत सर्वात मोठं विधान केलं आहे. 'आम्हाला माहिती आहे की खामेनी कुठे लपले आहेत. बिनशर्त आत्मसमर्पण करावं', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी राणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचं स्पष्ट नाव घेतलं नसलं तरी त्यांचा रोख हा त्यांच्याकडेच आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. इस्त्रायल आणि इराणमधील संघर्षाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या सोशल माध्यमावर एक पोस्ट करत इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्याबाबत आतापर्यंतचं सर्वात मोठं विधान केलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे की, "आम्हाला माहित आहे की तथाकथित सर्वोच्च नेते (इराणचे सर्वोच्च नेते) कुठे लपले हे आम्हाला चांगलंच माहिती आहे. ते सोपे टार्गेट आहेत, पण ते तिथे सुरक्षित आहेत. आम्ही त्यांना बाहेर काढणार नाहीत (मारणार नाही!)किमान सध्या तरी नाही. पण आम्हाला नागरिकांवर किंवा सैनिकांवर क्षेपणास्त्रे डागायची नाहीत. पण आमचा संयम सुटत चालला आहे", असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. इस्त्रायल आणि इराणमधील संघर्षाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या सोशल माध्यमावर एक पोस्ट करत म्हटलं आहे की, "आता आमचं इराणवरील आकाशावर पूर्ण नियंत्रण आहे. इराणकडे चांगले स्काय ट्रॅकर्स आणि इतर संरक्षणात्मक उपकरणे भरपूर होती. पण त्याची तुलना अमेरिकेने निर्माण केलेल्या गोष्टींशी होऊ शकत नाही. अमेरिकेपेक्षा हे कोणीही चांगलं करू शकत नाही," असं डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या सोशल माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. जी-७ परिषदेसाठी गेलेले राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प अचानक वेळेआधीच वॉशिंग्टनला परतल्यामुळे अनेकांनी भुवया उंचावल्या होत्या. इस्रायल-इराण संघर्षावर जी-७ परिषदेत चर्चा होणं अपेक्षित असताना डोनाल्ड ट्रम्प अचानक वॉशिंग्टनला का चालले असावेत? यावर तर्क-वितर्क चालू झाले. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांना लक्ष्य करताना ट्रम्प यांनी आपण इराण-इस्रायल संघर्षातील मुद्द्यांवर काम करण्यासाठी वॉशिंग्टनला जात नसल्याचंही स्पष्ट केलं होतं. या दोन्ही देशातील तणाव वाढलेला असताना अमेरिकेकडून या संघर्षाला इराणलाच जबाबदार ठरवण्यात येत आहे. यातच आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्याबाबत सर्वात मोठं विधान केलं आहे.

### हे आम्हाला चांगलंच माहिती आहे

'आम्हाला माहिती आहे की खामेनी कुठे लपले आहेत. बिनशर्त आत्मसमर्पण करावं', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी राणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचं स्पष्ट नाव घेतलं नसलं तरी त्यांचा रोख हा त्यांच्याकडेच आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.इस्त्रायल आणि इराणमधील संघर्षाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या सोशल माध्यमावर एक पोस्ट करत इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्याबाबत आतापर्यंतचं सर्वात मोठं विधान केलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे की, "आम्हाला माहित आहे की तथाकथित सर्वोच्च नेते (इराणचे सर्वोच्च नेते) कुठे लपले हे आम्हाला चांगलंच माहिती आहे.

# ड्रीमलायनरबाबत एअर इंडियाचे सावध पाऊल

## तांत्रिक कारणांमुळे दिल्ली-पॅरीस विमान रद्द झाले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहमदाबाद येथे १२ जून रोजी एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाल्यानंतरही एअर इंडियाच्या अडचणी संपलेल्या नाहीत. आज दिवसभरात विविध शहरांमधून आंतरराष्ट्रीय उड्डाण घेणाऱ्या तीन विमानांना रद्द करण्यात आलं आहे. आज सकाळी अहमदाबादहून लंडनला जाणारं विमान रद्द झालं. त्यानंतर अमृतसरहून लंडनला जाणारं विमानही रद्द करण्यात आलं. आता दिल्लीहून पॅरिसला जाणारं एअर इंडियाचं विमान रद्द करण्यात आलं आहे.**



दिवसभरात एअर इंडियाची सात उड्डाणे रद्द झाली आहेत. त्यापैकी सहा विमाने ही बोईंग ड्रीमलायनरशी संबंधित होती.एअर इंडियाच्या वतीने याबद्दल निवेदन प्रसिद्ध करण्यात आलं आहे. यात म्हटलं की, एअर इंडियाच्या एआय१४३ विमानाची पूर्वतपासणी करण्यात आल्यानंतर त्याचं उड्डाण रद्द करण्यात आलं आहे.एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी सांगितलं, "१७ जून रोजी दिल्लीहून पॅरिसला जाणारं एआय-१४३ हे विमान रद्द करण्यात येत आहे. उड्डाणापूर्वी अनिवार्य असलेली तपासणी केल्यानंतर काही तांत्रिक अडचणी आढळल्या, त्या सोडविण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान, पॅरिसच्या चार्ल्स डी गॉल (CDG) विमानतळावर रात्रीच्या उड्डाणावर निर्बंध असल्यामुळे सदर विमान रद्द करण्यात येत आहे. आम्ही प्रवाशांची हॉटेलमध्ये व्यवस्था करत आहोत. जर त्यांनी तिकीट रद्द केले, तर त्यांना पूर्ण पैसे परत दिले जातील किंवा त्यांची इच्छा असल्यास त्यांना दुसऱ्या विमानात सोय करून दिली जाईल.पॅरिसहून दिल्लीला परतणारं एआय-१४२ हे विमानही सॅन फ्रान्सिस्कोहून मुंबईच्या दिशेनं निघालेल्या एअर इंडियाच्या AI180 या विमानाचं सोमवारी मध्यरात्री नियोजित वेळेत १२ वाजून ४५ मिनिटांनी लॅंडिंग झालं. पण विमानाच्या डाव्या इंजिनमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्यामुळे कोलकात्याहून मुंबईच्या दिशेनं विमानाचं उड्डाण लांबलं.

### दिवसभरात सात उड्डाणे रद्द

जवळपास चार तासांहून अधिक काळ विमानतळावरच थांबल्यानंतरही सदर तांत्रिक समस्या दुरूस्त न झाल्यामुळे विमानातील सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आलं.अहमदाबाद येथे घडलेल्या अपघातात २४२ पैकी २४१ प्रवाशी मृत्यूमुखी पडल्यानंतर एअर इंडियाकडून अधिक खबरदारी घेण्यात येत आहे. त्यामुळेच तांत्रिक तपासात काहीही अडचण जाणवल्यास त्याचा परिणाम विमानाच्या वेळापत्रकावर होताना दिसत आहे.तांत्रिक गोंधळाबरोबरच हवामानाचाही फटका एअर इंडियाच्या सेवेला बसला आहे. अनेक शहरांमध्ये जोरदार पाऊस होत आहे. यामुळे दिल्ली आणि इतर ठिकाणच्या विमान सेवेवर परिणाम झाला आहे. एअर इंडियाने आपल्या अधिकृत एक्स हँडलवर याबद्दल पोस्ट टाकली.

# ‘ऑल इज वेल’ चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित



‘तीन तिघाडा काम बिघाडा’ ही म्हण खोटी ठरवत तीन मित्रांची धमाल दाखविणारा ‘ऑल इज वेल’ हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी २७ जूनपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. तत्पूर्वी या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर कलाकार व तंत्रज्ञांच्या उपस्थितीत नुकताच प्रकाशित झाला. याप्रसंगी निखळ हास्याची मेजवानी देणारा हा चित्रपट प्रेक्षकांना नक्की आवडेल, असा विश्वास दिग्दर्शक योगेश जाधव यांनी व्यक्त केला. तीन मित्रांची धमाल केमिस्ट्री आणि इतर कलाकारांचा मजेशीर अंदाज ‘ऑल इज वेल’ चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये दिसून येत आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शन सोहळ्यात बोलताना निर्माते अमोद मुचंडीकर, वाणी हालप्पनवर, तसेच सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी म्हणाले की, ‘काही तरी वेगळे करण्याच्या उद्देशाने आम्ही एकत्र आलो. प्रेक्षकांना धमाल करता येईल अशा कथानकाच्या शोधात असताना लेखक प्रियदर्शन जाधव, दिग्दर्शक योगेश जाधव आणि कार्यकारी निर्माते संजय ठुबे यांच्या सहकार्याने हा धमाल विषय आम्ही आणला आहे.हा चित्रपट म्हणजे सहकुटुंब अनुभवायला मिळणारी हास्याची मेजवानी असून मनोरंजनाची अफलातून पर्वणी असणार आहे.’ काही दिवसांपूर्वीच ‘ऑल इज वेल’ या चित्रपटाचे एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आल्यानंतर चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यानंतर आता चित्रपटाचा धमाल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे, रोहित हळदीकर, सयाजी शिंदे, अभिजीत चव्हाण, नक्षत्रा मेढेकर, सायली फाटक, माधव वझे, अजय जाधव, अमायरा गोस्वामी, दिशा काटकर या कलाकारांची जमून आलेली उत्तम भट्टी काही तरी धमाल घडवणार हे ट्रेलरवरून आपसूकच जाणवत आहे. ‘ऑल इज वेल’ चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश जाधव, तर लेखन प्रियदर्शन जाधव यांनी केले आहे. तर कार्यकारी निर्माते संजय ठुबे आहेत.

# जान्हवीचा मित्र ‘मॅड’ आहे तरी कोण?



‘लक्ष्मी निवास’ मालिकेत नुकताच वटपौर्णिमेचा सण साजरा करण्यात आला. एकीकडे ‘बायको हीच हवी’ म्हणत सिद्धूने भावनासाठी वडाच्या झाडाभोवती सात फेरे घेतले. तर, दुसरीकडे जान्हवीने लग्नानंतर तिची पहिली वटपौर्णिमा साजरी केली. पण, ऐन सणाच्या दिवशी जयंतने आपल्या बायकोची मोठी परीक्षा घेतली. जान्हवीचं आपल्यावर किती प्रेम आहे हे पाहण्यासाठी जयंतने मरणाचं नाटक केलं होतं. जयंतची अवस्था पाहून जान्हवी पूर्णपणे बिथरून गेली होती. सुरुवातीला जान्हवीने नवऱ्याचा पल्स रेट चेक केला, त्याला शेवटी CPR दिला पण, या सगळ्याचा काहीच उपयोग होत नाही. जवळपास तासाभराने जयंतने केलेलं नाटक जान्हवीसमोर उघड होतं. यानंतर मात्र जानू खूप संतापते.जयंतला वैतागलेली जान्हवी स्वत:ला खोलीत कोंडून घेते. शेवटी जयंत तिची समजूत काढतो आणि दोघांमधला अबोला दूर होतो. पण, एवढं सगळं झाल्यावरही जयंत काही केल्या सुधारणार नाहीये. आताही जयंतच्या मनात जान्हवी अन् मॅंड्याचा ( विश्वा ) नात्याबद्दल संशय असतो.

# लोकप्रिय अभिनेत्रीने घेतली आलिशान गाडी!



गेल्या काही महिन्यांमध्ये गौरव मोरे, जान्हवी किल्लेकर, यशोमन आपटे अशा अनेक मराठी कलाकारांनी आलिशान गाड्या खरेदी करत आपली स्वप्नपूर्ती केल्याचं पाहायला मिळालं. आता नवीन गाडी घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत आणखी एका लोकप्रिय मराठी अभिनेत्रीचं नाव जोडलं जाणार आहे. या अभिनेत्रीने तिच्या आलिशान गाडीची पहिली झलक इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. ‘अशी ही आशिकी’ या चित्रपटामुळे अभिनेत्री हेमल इंगळे घराघरांत लोकप्रिय झाली. तिच्या सहज सुंदर अभिनयाने अल्पावधीतच हेमलने सर्वांचं मन जिंकून घेतलं. अभिनेत्रीच्या घरी नुकतंच नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे. हेमलने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करत नव्या कारची झलक सर्वांना दाखवली आहे. यावेळी तिचा पती व अन्य कुटुंबीय देखील उपस्थित होते. वैयक्तिक आयुष्यात हेमल यंदाच्या वर्षी जानेवारी महिन्यात विवाहबंधनात अडकली. जवळपास साडेसात वर्षांच्या रिलेशनशिपनंतर हेमल आणि रौनक विवाहबंधनात अडकले. आता अभिनेत्रीने तिच्या चाहत्यांना नवीन गाडी खरेदी करत आनंदाची बातमी दिली आहे.हेमल व तिच्या पतीने ही आलिशान गाडी खरेदी केली आहे. या आलिशान कारची किंमत जवळपास ५३ लाखांच्या घरात आहे. ( एक्स-शोरुम ) अशी माहिती फायनान्सशियल एक्स्प्रेसने दिली आहे. सध्या मराठी कलाविश्वातून हेमलवर या नव्या कारसाठी कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.



# तारा करणार ‘ती’ चूक; तिचे सत्य उघडकीस येणार का?

सावळ्याची जणू सावली’ मालिकेत अनेक ट्विस्ट पाहायला मिळत आहेत. सावली व सारंग यांच्यातील केमिस्ट्री प्रेक्षकांना आवडू लागल्याचे दिसत आहे. सारंग व सावलीच्या मध्ये येऊ पाहणारी अस्मी आता त्यांच्या आयुष्यातून निघून गेली आहे. मात्र, आता मेहेंदळे कुटुंबात तारा सोहमशी लग्न करून आली आहे. तारा सावलीला सतत त्रास देत असल्याचे दिसत आहे. कधी ती तिचा स्वयंपाक खराब करण्याचा प्रयत्न करते, कधी तिला इजा व्हावी म्हणून खिळे टाकते, तर कधी तिला धमकी देताना दिसते.मालिकेत दाखविल्याप्रमाणे सावली तारासाठी गाणे गाते. गरीब कुटुंबातील सावलीचा आवाज चांगले असल्याचे ओळखून ताराची आई भैरवी वझे तिच्या आवाजाचा वापर करायचा ठरवते. तारासाठी सावली गाणे गात राहील, तिचा आवाज भैरवीकडे गहाण राहील आणि त्या बदल्यात भैरवी सावलीच्या कुटुंबाला आर्थिक मदत करेल, असे भैरवीने करार केला होता. अनेकदा भैरवी सावलीला त्रास देते. जगासमोर तारा लोकप्रिय गायिका आहे, पण खरेतर तो आवाज सावलीचा आहे; हे रहस्य मोजक्या लोकांना माहीत आहे. आता ‘सावळ्याची जणू सावली‘ मालिकेचा एक प्रोमो समोर आला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, तारा कोणाशीतरी फोनवर बोलत आहे. ती म्हणते, कोणाला शंका यायला नाही पाहिजे की मी नाही तर सावली गात आहे. कळलं? म्हणून ती मोठ्याने विचारते. तितक्यात तिथे ऐश्वर्या आलेली दिसते, ते पाहून ताराला धक्का बसतो. प्रोमोमध्ये पुढे पाहायला मिळते की सावलीसह सारंग तिच्या माहेरी आला आहे. सावलीचा भाऊ आजारी आहे. ते दोघेही सखदेवच्या शेजारी बसले आहेत.

# 5 नाही 4 दिवसांचा होणार कसोटी सामना!

## आयसीसीचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपसाठी खास प्लॅन

। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कसोटी क्रिकेट म्हटलं की पाच दिवस दोन संघांमध्ये अटीतटीची क्रिकेट पाहण्याचा रोमांच अनुभवायला मिळणार हे निश्चित होतं. सामना जिंकण्यासाठी दोन्ही संघांमध्ये रस्सीखेच आपल्याला पाहायला मिळते. पण आता यातच मोठा बदल होणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या नव्या चक्राला सुरूवात झाली आहे आणि आता या चक्रामध्ये कसोटी सामन्याचे दिवस कमी करण्यात येणार आहेत.**



आयसीसीने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ साठी एक मोठा निर्णय घेणार आहे. कसोटी सामना ५ ऐवजी ४ दिवसांचा खेळवला जाणार आहे. या निर्णयाचा परिणाम सर्व संघांवर होणार नाही, परंतु कसोटी क्रिकेट आणखी मनोरंजक बनवण्याचा हा प्रयत्न आहे. आयसीसी लवकरच यावर अंतिम निर्णयाची घोषणा करणार आहे.कसोटी सामना आता ५ ऐवजी ४ दिवसांमध्ये खेळवला जाणार आहे. द गार्डियनचा एक अहवाल समोर आला आहे, ज्यामध्ये असं म्हटलं आहे की आता लहान देशांसाठी चार दिवसांचे कसोटी सामने आयोजित केले जाऊ शकतात. या निर्णयामागचा मुख्य हेतू म्हणजे लहान देश देखील सतत कसोटी क्रिकेट खेळू शकतील.आयसीसी अध्यक्ष जय शाह अलीकडेच इंग्लंडमध्ये होते, जिथे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीचा अंतिम सामना लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर खेळवण्यात आला होता. असं म्हटलं जातंय की, जय शाह यांनी यामध्ये चार दिवसांच्या कसोटीसाठी सहमती दर्शविली आहे.

सध्या समोर आलेल्या माहितीनुसार भारत, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया सारख्या संघांमधील कसोटी मालिका ही प्रत्येकी पाच दिवसांची असेल, परंतु जेव्हा हे संघ लहान देशांविरुद्ध खेळतील तेव्हा सामन्यांचे दिवस चार दिवसांपर्यंत कमी केले जातील. २०१७ मध्येच आयसीसीने चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता दिली होती, परंतु हे सामने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग नव्हते.अलीकडेच इंग्लंडने झिम्बाब्वेविरुद्ध चार दिवसांचा कसोटी सामना खेळला. पण हा WTC चक्रातील सामना नव्हता. म्हणजेच, या सामन्यातील विजय किंवा पराभवाचा जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेवर कोणताही परिणाम होणार नव्हता.जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२७ मात्र पाच दिवसांच्या सामन्यांच्या स्वरूपाप्रमाणे सुरू राहील. मंगळवारी श्रीलंकेविरुद्ध बांगलादेशविरुद्ध दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेने त्याची सुरुवात होईल. WTC 2025-27 मध्ये नऊ देशांमध्ये खेळल्या जाणाऱ्या २७ कसोटी मालिकांपैकी १७ मालिका या फक्त दोन सामन्यांच्या मालिका असतील तर तीन सामन्यांच्या ६ मालिका खेळवल्या जातील.आयसीसीने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ साठी एक मोठा निर्णय घेणार आहे. कसोटी सामना ५ ऐवजी ४ दिवसांचा खेळवला जाणार आहे. या निर्णयाचा परिणाम सर्व संघांवर होणार नाही, परंतु कसोटी क्रिकेट आणखी मनोरंजक बनवण्याचा हा प्रयत्न आहे. आयसीसी लवकरच यावर अंतिम निर्णयाची घोषणा करणार आहे.कसोटी सामना आता ५ ऐवजी ४ दिवसांमध्ये खेळवला जाणार आहे. द गार्डियनचा एक अहवाल समोर आला आहे, ज्यामध्ये असं म्हटलं आहे की आता लहान देशांसाठी चार दिवसांचे कसोटी सामने आयोजित केले जाऊ शकतात.

### चार दिवसांच्या कसोटीसाठी सहमती

या निर्णयामागचा मुख्य हेतू म्हणजे लहान देश देखील सतत कसोटी क्रिकेट खेळू शकतील.आयसीसी अध्यक्ष जय शाह अलीकडेच इंग्लंडमध्ये होते, जिथे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीचा अंतिम सामना लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर खेळवण्यात आला होता. असं म्हटलं जातंय की, जय शाह यांनी यामध्ये चार दिवसांच्या कसोटीसाठी सहमती दर्शविली आहे. सध्या समोर आलेल्या माहितीनुसार भारत, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया सारख्या संघांमधील कसोटी मालिका ही प्रत्येकी पाच दिवसांची असेल, परंतु जेव्हा हे संघ लहान देशांविरुद्ध खेळतील तेव्हा सामन्यांचे दिवस चार दिवसांपर्यंत कमी केले जातील. २०१७ मध्येच आयसीसीने चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता दिली होती, परंतु हे सामने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग नव्हते.अलीकडेच इंग्लंडने झिम्बाब्वेविरुद्ध चार दिवसांचा कसोटी सामना खेळला. पण हा WTC चक्रातील सामना नव्हता.

---

# स्मृती मानधना ठरली वर्ल्ड नंबर वन!

## वनडे क्रिकेटमध्ये 6 वर्षांनी परत मिळवला ताज

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताची उत्कृष्ट महिला फलंदाज स्मृती मानधना पुन्हा एकदा जगातील नंबर वन फलंदाज ठरली आहे. वनडे क्रिकेटमध्ये अनेक विक्रम मानधनाने आपल्या नावे केले आहेत. गेल्या काही काळातील सातत्यपूर्ण वनडे क्रिकेटमधील कामगिरीची स्मृती मानधनाला परतफेड मिळाली आहे.**



भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना ही एकदिवसीय क्रिकेटमध्ये जगातील नंबर वन फलंदाज बनली आहे. मानधना हिने सहा वर्षांनंतर तिचा गमावलेला ताज परत मिळवला आहे. मंगळवारी भारताची उपकर्णधार मानधना २०१९ नंतर पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) जाहीर केलेल्या एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचली.दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्ड हिने ताज्या क्रमवारीत १९ रेटिंग गुण गमावले, ज्यामुळे मानधनाला फायदा झाला आणि ती पुन्हा एकदा पहिल्या क्रमांकावर पोहोचली. मानधनाचे एकूण ७२७ रेटिंग गुण आहेत. तिच्या पाठोपाठ इंग्लंडची कर्णधार नताली सायव्हर-ब्रंट ७१९ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. वोल्वार्ड आता ७१९ गुणांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे.स्मृती मानधनानंतर या यादीतील पुढील दोन भारतीय फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज आणि कर्णधार हरमनप्रीत कौर आहेत, ज्या अनुक्रमे १४ व्या आणि १५ व्या स्थानावर आहेत. या महिन्याच्या अखेरीस भारत आणि इंग्लंडमध्ये पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जाईल. अलिकडच्या काळात मानधना एकदिवसीय फलंदाजांच्या यादीत सातत्याने टॉप-१० मध्ये राहिली आहे, परंतु २०१९ च्या सुरुवातीपासून स्मृती अव्वल स्थानावर पोहोचू शकलेली नाही.भारतीय सलामीवीर हल्ली उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि तिने कोलंबोमध्ये येथील श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात शतक झळकावले. यामुळे तिला रँकिंग सुधारण्यास मदत झाली. टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या यादीतही मानधना चौथ्या क्रमांकावर आहे.२०१३ मध्ये बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या मानधनाने भारतासाठी १०२ एकदिवसीय सामने खेळले आहेत, ८७.७९ च्या स्ट्राईक रेटने ४४७३ धावा केल्या आहेत. तिच्या नावे ११ शतकं आणि ३१ अर्धशतकं आहेत. तिने श्रीलंकेविरुद्ध अखेरचा वनडे सामना खेळला होता. सध्या भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यासाठी तयारी करत आहे. याशिवाय यंदा ३० सप्टेंबरपासून महिला वनडे वर्ल्डकप खेळवला जाणार आहे. त्यामुळे स्मृती मानधनाचा फॉर्म संघासाठी खूप महत्त्वाचा असणार आहे.

### मानधनाचे 727 रेटिंग गुण आहेत

भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना ही एकदिवसीय क्रिकेटमध्ये जगातील नंबर वन फलंदाज बनली आहे.दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्ड हिने ताज्या क्रमवारीत १९ रेटिंग गुण गमावले, ज्यामुळे मानधनाला फायदा झाला आणि ती पुन्हा एकदा पहिल्या क्रमांकावर पोहोचली. मानधनाचे एकूण ७२७ रेटिंग गुण आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।

। दि. 18 जून 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडचे नाव “जिजाऊ नगर”?

## महेश बारणे यांची मागणी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**। नवी दिल्ली।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका एक औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते. परंतु या शहराला, या भूमीला मा जिजाऊ यांच्या संस्काराची, अस्मितेची चिरंतन असणारी एक ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. छत्रपती शिवराय यांच्यामध्ये स्वराज्याचे स्फुल्लिंग मा जिजाऊ यांनी जागविले. माँ जिजाऊंना म्हणजेच मातृशक्तीला मानाचा मुजरा करून पिंपरी चिंचवड शहराचे नाव “जिजाऊ नगर” करावे, अशी मागणी भक्ती शक्ती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश हिरामण बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**







यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांना बारणे यांनी माँ जिजाऊ आणि छत्रपती शिवराय व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे शिल्प असणारी प्रतिकृती भेट दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या पत्रात महेश बारणे यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहराचे नाव “जिजाऊ नगर” करण्यात यावे ही केवळ नामांतरणाची मागणी नाही. हा महाराष्ट्राच्या मातृशक्तीला मानाचा मुजरा आहे. ही मा जिजाऊ यांची स्मृती, अभिमानाची साक्ष आहे. जिजाऊंच्या स्वाभिमानी विचारांपुढे नतमस्तक होऊन त्यांचा गौरव होण्याची हीच योग्य वेळ आहे अशी या भूमीतल्या सर्वांची सार्वत्रिक भावना आहे.

### औद्योगिकनगरीची ऐतिहासिक ओळख..

स्वराज्य ही केवळ एक राजकीय संकल्पना नव्हती तर ती एक चेतना होती. धगधगतं स्वप्न आणि जळजळीत स्फुल्लिंग होतं. हे स्वप्न ज्या मनगटांनी प्रत्यक्षात आणलं ते छत्रपती शिवराय, पण शिवरायांच्या मनगटाआधी ज्या मायेच्या काळजावर ते सर्वप्रथम उमटलं... त्या होत्या माँसाहेब जिजाऊ! शिवरायांच्या शौर्यात जितकं तलवारीचं योगदान, तितकंच मोलाचं बळ त्यांच्या माऊलीच्या संस्कारांचेही आहे. म्हणूनच ज्या भूमीवर त्या माऊलीची पावलं पडली, जिथे स्वराज्याचा पहिला श्वास घेतला गेला, ती भूमी केवळ “औद्योगिक नगरी” म्हणून नव्हे, तर “ऐतिहासिक” म्हणून ओळखली गेली पाहिजे !

### निर्जीव इंग्रजी उल्लेख

आज आपण ज्या शहराचा उल्लेख करताना सर्रास पीसीएमसी किंवा पिंपरी चिंचवड म्हणतो, ते नाव ही कालौघात आलेलं. काही छोट्या गावांच्या एकत्रीकरणातून जन्मलेलं हे शहर, औद्योगिकीकरणाच्या लाटेत प्रचंड वेगाने वाढलं. परंतु या नावाला काही ऐतिहासिक ठसा नाही, काही आदर्शात्मक प्रेरणा नाही. निर्जीव इंग्रजी उल्लेख होणं इतकंच या ऐतिहासिक भूमीच्या नशिबी आलं.

### जाज्ज्वल्य भूतकाळ आपण का विसरायचा ?

आपण आपला जाज्ज्वल्य भूतकाळ आपण का विसरायचा ? ज्या मायेनं ‘शिवबा’ घडवले, तिच्या नावाने हे शहर घडवायला आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून लवकरात लवकर निर्णय घ्यावा. साडेतीनशे वर्षांच्या या इतिहासात माँसाहेब जिजाऊंनी दिलेला वारसा आजही आपल्या धमन्यांतून वाहतोय. पण आपण त्यांच्या नावाचा, त्यांच्या त्यागाचा, त्यांच्या मायेच्या सामर्थ्याचा सन्मान केला पाहिजे. भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने आणि सर्व शहरवासीयाचे वतीने आपणांस नम्र विनंती करीत आहोत की पिंपरी चिंचवड हे नाव बदलून ‘जिजाऊ नगर’ असे नाव करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.




EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26 ADMISSIONS OPEN

प्रज्वलितो ज्ञानमियो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण









* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292